# पवई पोलीस ठाणे, मुंबई

## पवई पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र ३०६/२०२५ कलम ३०९(४),३(५) बी.एन.एस.२०२३ या गुन्हयामध्ये केलेल्या तांत्रिक कौशल्यपुर्वक तपासाबाबतची माहिती

पवई पोलीस ठाण्याच्या हद्दीत 05.04.2025 रोजी सकाळी झालेल्या जबरी चोरीच्या दोन घटनांमधील आरोपींना पवई पोलिसांनी अवघ्या 48 तासांच्या आत अटक करून दोन्ही गुन्ह्यांची यशस्वी उकल केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत, गु.र.क्र. 311/2025 कलम 309 (6), 3(5) भारतीय न्याय संहिता दि. 05. 04.2025 रोजी सकाळी 08.10 वाजता आयआयटी मार्केट गेट समोर 59 वर्षीय महिलेला 'मेडीकल कुठे आहे' असे विचारून बोलण्यात गुंतवून आरोपींनी तिच्या तोंडावर घाणेरडा कपडा टाकला आणि तिच्या गळ्यातील 15 ग्रॅम वजनाची सोन्याची मणी असलेली माळ जबरदस्तीने तोडून चोरली.

दुसऱ्या घटनेत, गु.र.क्र. 306/25 कलम 309(4), 3(5) भा.न्या.सं त्याच दिवशी सकाळी 08. 30 वाजता जलवायु विहार, हिरानंदानी गार्डन येथे दोन आरोपींनी 45 वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दोन हार, अंदाजे २० ग्रॅम वजनाचे, चालू असलेल्या झज्ड 200 दुचाकीवरून जबरदस्तीने खेचून चोरले.

सदर गुन्ह्यांची गंभीरता लक्षात घेता, मा. पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १०, श्री. सचिन गुंजाळ, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, साकीनाका विभाग, श्री. प्रदीप मैराळे आणि मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे, श्री. जितेंद्र सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पवई पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री. गणेश आव्हाड आणि त्यांच्या पथकाने तातडीने तपास सुरू केला.

तपासादरम्यान पोलिसांनी 100 हून अधिक सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण केले, ज्यात आरोपी ओशिवारा येथील बेहराम बाग परिसरात पळून जाताना दिसले. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून वर्णनानुसार असलेल्या स्पोर्ट्स मोटरसायकलवरून पप्पू गजेंद्र मिश्रा (वय २० वर्षे) आणि सुनील गंगा महतो (वय २० वर्षे), दोन्ही राहणार अंधेरी (पश्चिम), मुंबई यांना अटक केली.

आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली केटीएम २०० मोटारसायकल, पहिल्या गुन्ह्यातील १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार आणि दुसऱ्या गुन्ह्यातील २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण ३० ग्रॅम वजनाचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. तपासात असेही निष्पन्न झाले आहे की गुन्ह्यात वापरलेली केटीएम २०० मोटारसायकल यातील अटक आरोपी पप्पू मिश्रा याने 6 महिन्यांपूर्वी राबोडी, ठाणे हद्दीतून चोरी केली होती. त्याद्वारे पवई पोलीसांनी राबोडी पोलीस ठाणेत दाखल गु.र.क्र. 817ध्2025 कलम 303 (2) भा.न्या.सं. केटीएम बाईक चोरी हा गुन्हा देखील उघड केला आहे. अशा प्रकारे एकूण 03 गंभीर गुन्हे पवई पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने यशस्वीरित्या उघड केले आहे.

ही यशस्वी कामगिरी पोलीस उप निरीक्षक गणेश आव्हाड, पोलीस हवालदार चव्हाण (040067), पोलीस हवालदार टिळेकर (960607), पोलीस शिपाई साटम (091005 पोलीस शिपाई शिरसाट (150900), पोलीस शिपाई वारंग 111096 आणि पोलीस शिपाई कुंदे 141622 यांच्या पथकाने केली आहे. पुढील तपास सुरू आहे.